| MHST130014882025 | **रे.दि.मु. क्र. २७२/२०२५**<br><br>**संगीता श्रीकृष्ण देवकांत वगैरे**<br>**विरूध्द**<br>**अरूण मारूती देवकांत वगैरे** |
|---|---|

## निशाणी ८ वरील आदेश

प्रतिवादींनी त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जाचे व दाखल म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकला.

३. प्रतिवादी यांना महत्त्वाचे कागदपत्रे, उतारे, फेरफार, दस्त वेळेत मिळाली नाहीत. तसेच घरगुती कामाच्या व्यापामुळे कागदपत्रे उपलब्ध करून मे. कोर्टात हजर राहून वकीलांना वेळेत माहिती देणे शक्य झाले नाही. वादीने सदर अर्जास सक्त हरकत घेतली. त्यांनी सदर कारण हे संयुक्तिक नाही, असे कथन केले. वादीने पुढे असे कथन केले की, वैकल्पीकरित्या सदर अर्ज मंजूर झाल्यास त्यांना जास्तीत जास्त खर्च मिळावा.

४. दाव्याचे अवलोकन केले. सदर निरंतर ताकीद व इतर मागण्यांकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे दि. २४.१२.२०२५ रोजी त्यांच्या वकिलांमार्फत हजर झाले. परंतु, त्यांनी कैफियत मुदतीत दाखल केली नाही. प्रतिवादीने सदर अर्जात नमूद केलेली कारणे संयुक्तिक नाहीत. तसेच त्यानंतर ब-याच

कालावधीनंतर दि. ०३.०७.२०२६ रोजी प्रतिवादींनी सदर अर्ज दाखल केला आहे. परंतु, दाव्याचा निकाल गुणवत्तेवर लागण्याकरिता विरुध्द पक्षाचे म्हणणे घेणे गरजेचे आहे. तसेच विरुध्द पक्षाला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्रतिवादी यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करणे न्यायोचित आहे. तसेच विलंब बघता खर्चाचे आदेश करणे उचित आहे. सबब, खालील आदेश

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी वादींना प्रत्येकी रक्कम रुपये १००/- (अक्षरी शंभर रुपये मात्र) दिल्यानंतर त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करण्यात येतो.

Digitally signed by ISHA MEENAKSHEE GHATGE
Date: 2026.07.27 16:33:34 +0530

( ईशा व्ही. घाटगे )
सह दिवाणी न्यायाधीश
क. स्तर, पाटण.

पाटण,
दि - २७.०७.२०२६.